MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
CIN No.U40109MH2005SGC153646
कार्यकारी अभियंता
अउदा ( संवसु ) विभाग, भंडारा
पहिला माळा, विद्युत भवन, नागपूर रोड,
भंडारा पिन कोड –441904
दुरध्वनी क्र 07184–252114 (कार्या)
ई–मेल :–ee4120@mahatransco.in.

का. अ./ अउदा/संवसु/पारेषण/वि./भंडारा/मासं/45 दि. 08/02/2025

## शिकाऊ उमेदवार कायदा 1961 अंतर्गत सत्र 2024–25 करीता प्रतिक्षा यादीतुन निवड झालेल्या उमेदवाराची तात्पुरती निवड यादी क. 02

1. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण पात्र उमेउवारांकडुन अउदा संवसु प्रविभाग, नागपुर अंर्तगत अऊदा (संवसु) विभाग भंडारा करीता एकुण 26 जागांकरीता शिकाऊ उमेदवारी एक वर्ष कालावधी करीता ऑनलाईन अर्ज तथा ऑफलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतीम दि.08.08.2024 तसेच स्वहस्ते /पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतीम दि. 14.08.2024 होती.

2. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. तसेच आय.टी.आय ( विजतंत्री ) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहितीनुसार प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे.

3. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे. अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवुन वयाच्या ज्येष्ठतेनुसार कमवारी लावण्यात आली.

4. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारीकरीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी ही उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व ईतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

5. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस शैक्षणिक पात्रतेसंबंधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातुन अर्ज सादर केलेला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनकिमीलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे.त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनकिमीलेअर प्रमाणपत्र) दि. 31.12.2023 पर्यत वैध असलेले प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातील उमेदवारांना ई. डब्लु.एस. प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, ईत्यादी मुळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरिलपैकी मुळ प्रमाणपत्र दर्शविण्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

6. तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहीत मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरूनही दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत रूजु न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील कमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होऊन खुल्या तथा राखीव जागांकरीता प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अऊदा (संवसु) विमाग भंडारा राखुन ठेवत आहे.

7. तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अऊदा (संवसु) विभाग भंडारा राखुन ठेवत आहे.

8. निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन,ईमेल किंवा पत्रव्यहार अऊदा (संवसु) विभाग भंडारा कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही ईमेल किंवा पत्रव्यवहाराची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

9. तात्पुरती निवड यादीतुन निवड झालेल्या उमेदवारांनी दि.08.01.2025 पासुन दि.13.01.2025 पर्यंत कार्यकारी अभियंता, अऊदा (संवसु) विभाग भंडारा पहिला माळा विद्युत भवन नागपूर रोड, भंडारा– 441904 या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी ( शनिवार/रविवार वगळुन ) कार्यालयीन वेळेत सकाळी 10:00 ते 06:15 मुददा क.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुळ प्रमाणपत्रे ( 1 संच साक्षांकित झेरॉक्स प्रतीसह ) पडताळणीकरीता हजर राहावे. दि.13.01.2025 नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा–या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

10. कागदपत्र पडताळणी करीता येणा–या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवासखर्च किंवा ईतर खर्च दिल्या जाणार नाही, सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

कार्यकारी अभियंता, अऊदा (संवसु) विभाग भंडारा या विभागात तात्पुरती निवड झालेल्या उमेदवाराचीं तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी –2 खालील प्रमाणे

## PROVISIONAL WAITING SELECT LIST -2

### SC Category

| Sr. No. | Candidate Name | Caste/ Category | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | Vinay Dinesh Kamble | SC | |

(के. एन. मोयर)
(कार्यकारी अभियंता)
अऊदा (संवसु) विभाग भंडारा